नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ४३ Issue - 43 | वार - मंगळवार दि. ७ जुलै २०२६ Blow- Tuesday Date 7 JULLY 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## राज्यात पावसाचा कहर; १३ जणांचा मृत्यू, १० जखमी

### मानखुर्द येथे झोपडपट्टीवर इमारत कोसळून ६ जणांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबईः मुंबई, ठाणे, पुणे आणि नाशिकसह राज्यातील अनेक जिल्ह्यांना मागील दोन ते तीन दिवसांपासून मुसळधार पावसाने झोडपून काढलं असून काही ठिकाणी दुर्घटना घडल्या आहेत. राज्यभरात पावसामुळे विविध दुर्घटनांमध्ये आतापर्यंत एकूण १३ जणांना आपला जीव गमवावा लागला असून १० जण जखमी झाले आहेत. ५ जुलै रोजी मानखुर्द येथे झोपडपट्टीवर इमारत कोसळून ६ जणांनी आपला जीव गमावला, तर पालघरमध्ये पोहताना बुडून एक जण, मुंबई उपनगरात झाड कोसळून दोन जण, साताऱ्यात दरड कोसळून एक जण, सिंधुदुर्गात बुडून एक जण, पुण्यात दरड कोसळून एक जण, ठाण्यात पाण्यात बुडून एक जण तर घर कोसळून एक जण,



रायगडमध्ये पाण्यात बुडून एक जण अशा एकूण १३ जणांचा मृत्यू झाला आहे. पावसाचा परिणाम सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर झाला असून पुणे-मुंबई एक्सप्रेसवे व जुना महामार्ग, मिसिंग लिंक रस्ता, रेल्वे मार्गावरील दोन्ही बाजूंची वाहतूक थांबवली आहे. तर मावळ व ताम्हिणी घाटात पूरस्थिती असून पर्यायी मार्ग प्रभावित झाले आहेत. त्यामुळे नागरिकांनी अत्यावश्यक कारणाशिवाय प्रवास टाळावा, असं आवाहन करण्यात आलं आहे. महाराष्ट्रात उद्भवलेल्या संभाव्य पूरपरिस्थिती आणि मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेला सतर्क राहण्याचं व प्रशासनाला सहकार्य करण्याचं आवाहन केलं आहे. राज्यात कोणत्याही प्रकारची आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांना तातडीने मदत मिळावी, यासाठी राज्य सरकारची संपूर्ण यंत्रणा सज्ज असून २४ तास कार्यरत असणारे नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आले असून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत सूत्रांकडून येणाऱ्या माहितीचा आधार घ्यावा आणि संकटसमयी जाहीर केलेल्या अधिकृत हेल्पलाईन क्रमांकांवर त्वरित संपर्क साधावा, असं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे. राज्यस्तरीय मुख्य नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्यासाठी १०७० हा टोल-फ्री क्रमांक कार्यान्वित करण्यात आला असून, नागरिक ०९३२१५८७१४३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर किंवा ०२२-२२०२७९९० आणि ०२२-२२७९४२२९ या दूरध्वनी क्रमांकांवर देखील थेट संपर्क साधता येईल. याशिवाय, प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्थानिक पातळीवर जलद गतीने मदत कार्य राबवण्यासाठी आणि परिस्थितीवर तात्काळ नियंत्रण मिळवण्यासाठी जिल्हास्तरीय नियंत्रण कक्षही सज्ज ठेवण्यात आले आहेत, ज्यांचा मुख्य संपर्क क्रमांक १०७७ असा आहे, असंही आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. दरम्यान, कोणत्याही आपत्कालीन प्रसंगी नागरिकांनी अजिबात न घाबरता या जाहीर केलेल्या हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधून प्रशासकीय यंत्रणेची मदत घ्यावी, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं आहे.

## पुढील २४ तासात अतिवृष्टीचा इशारा

### २९१ ठिकाणी झाडे कोसळली, २२ ठिकाणी भिंती-घरांचे नुकसान;

मुंबईत सोमवारी (६ जुलै) दिवसभर मुसळधार पावसाने हजेरी लावली असून शहरातील जनजीवनावर त्याचा मोठा परिणाम झाला आहे. सकाळी ८ ते सायंकाळी ६ या कालावधीत शहर आणि उपनगरांमध्ये जोरदार पावसाची नोंद झाली. मुंबई महापालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन विभागाने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, शहरात तब्बल २९१ ठिकाणी झाडे व फांद्या कोसळल्याच्या, तर २२ ठिकाणी भिंती अथवा घरांचे भाग कोसळल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

हवामान विभागाच्या माहितीनुसार, पुढील तास मुंबई शहर आणि उपनगरात संततधार पाऊस कायम राहणार असून काही भागांत जोरदार ते अति जोरदार, तर काही ठिकाणी अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. याशिवाय ताशी ७० ते ८० किलोमीटर वेगाने सोसाट्याचे वारे वाहण्याचाही इशारा देण्यात आला आहे. महापालिकेच्या अहवालानुसार, मागील २४ तासांत कुलाबा येथे १२८ मिमी, तर सांताक्रूझ येथे १५९.२ मिमी पावसाची नोंद झाली. सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत कुलाबा येथे ३९.२ मिमी, तर सांताक्रूझ येथे ६९.६ मिमी पाऊस झाला. महापालिकेच्या स्वयंचलित पर्जन्यमापन केंद्रांनुसार शहरात २८.२ मिमी, पूर्व उपनगरात ६१.७५ मिमी आणि पश्चिम उपनगरात ६५.४५ मिमी पावसाची नोंद झाली. मुसळधार पावसामुळे शहरात ७४, पूर्व उपनगरात ७८ आणि पश्चिम उपनगरात १३९ अशा एकूण २९१ ठिकाणी झाडे व फांद्या पडल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. तसेच १२ ठिकाणी शॉर्टसर्किटच्या घटना, तर २२ ठिकाणी भिंती किंवा घरांचे भाग कोसळल्याच्या तक्रारी नोंदवण्यात आल्या. सुदैवाने या घटनांमध्ये कोणतीही जीवितहानी झालेली नाही. संबंधित विभागांनी तातडीने मदतकार्य सुरू केले आहे.



दरम्यान, पावसाचा जोर असूनही मुंबईतील रस्ते वाहतूक तसेच मध्य आणि पश्चिम रेल्वेची सेवा सुरळीत सुरू असल्याची माहिती महापालिकेने दिली आहे. मात्र, नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडताना खबरदारी घ्यावी, समुद्रकिनाऱ्याजवळ जाणे टाळावे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## उजनी धरणात २० हजार क्यूसेस पाण्याची आवक सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

भीमा नदी खोऱ्यात गेल्या पाच दिवसापासून मोठ्या प्रमाणात पाऊस चालू आहे त्यामुळे उजनी धरणात दौंड इथून सुमारे २०, क्यू सेक्स पाण्याची होत आहे त्यामुळे उजनी धरणाला दिलासा मिळाला आहे.

गेल्या वर्षी चांगला पाऊस पडल्यामुळे पाच जुलै उजनी धरण ७५ टक्के भरले होते. एकदा पावसाने हुलकावणी दिली असल्यामुळे म्हणून तसं पाऊस पडला नसल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाला असून तुम्ही घरातून पाण्याची पातळी खालावली आहे.

सध्या उजनी धरणात वजा २७% पाणी आहे हे पाणी पिण्यासाठी शासनाने राखीव ठेवले आहे.

जून महिना कोरडा गेला असून जुलै महिन्यातील पावसाने सुरुवात केली आहे. गेल्या पाच दिवसापासून भीमा निरा खोऱ्यात जोरदार पाऊस पडत असल्यामुळे पुणे जिल्ह्यातही चांगला पाऊस मुळा मोठा नद्यांना पूर आला असून परिसरांना सतत त्याचा इशारा दिला आहे. उजनी धरणाच्या वरच्या भागातील धरण क्षेत्रात असल्यामुळे दौंड मधून उजनी धरणाकडे वीस हजार क्यूसेक्स पाण्याचा विसर्ग त्यामुळे उजनी धरणातील पाण्याची पातळी वाढ होत आहे. शेतकरी व नागरिकांना दिलासा मिळत आहे.

### संपूर्ण शासकीय यंत्रणा अलर्ट मोडवर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क राहून अनावश्यक प्रवास टाळावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील अतिवृष्टी आणि बदलत्या नैसर्गिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाची संपूर्ण यंत्रणा सज्ज आहे. नागरिकांनी सतर्कता बाळगून अनावश्यक प्रवास टाळावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

विधानसभेत राज्यातील अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीबाबत माहिती देताना मुख्यमंत्री बोलत होते.

यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, हवामानातील बदलामुळे निर्माण होणाऱ्या अतिवृष्टी, दरडी कोसळणे आणि जोरदार वाऱ्यासारख्या घटना या निसर्गाच्या बदललेल्या चक्राचा भाग आहेत. अशा परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी शासनाने पूर्वतयारी केली असली तरी काही वेळा अपेक्षेपेक्षा वेगळ्या घटना घडतात. मात्र अशा प्रत्येक परिस्थितीत महानगरपालिका, राज्य आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि संबंधित सर्व विभाग रस्त्यावर उतरून तातडीने मदतकार्य करत आहेत.

नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत धोकादायक ठिकाणी त्वरित वाहतूक वळविणे, रस्ते बंद करून पर्यायी मार्ग उपलब्ध करून देणे, अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित परत आणणे तसेच



**राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्ष अलर्ट मोडवर असल्याचे मुख्यमंत्री यांचे विधानसभेत निवेदन**

पाण्यात अडकलेल्या वाहनांना बाहेर काढण्यासाठी मदतकार्य सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

मुख्यमंत्री यांनी सांगितले की, संभाव्य धोका लक्षात घेऊन गेल्या दोन दिवसांत धोकादायक भागांतील नागरिकांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्यात आले असून त्यांच्या निवासाचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री म्हणाले की, आजचा दिवस अत्यंत महत्त्वाचा असून दुपारनंतर राज्यातील काही भागांत जोरदार वारे आणि मुसळधार पावसाचा इशारा आहे. त्यामुळे नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी, शक्यतो प्रवास टाळावा आणि कोणत्याही परिस्थितीत अनावश्यक बाहेर पडू नये.

विशेषतः तरुणांना आवाहन करताना मुख्यमंत्री म्हणाले की, पावसाळी पर्यटन, धबधबे, घाट परिसर किंवा धोकादायक ठिकाणी फिरण्यासाठी जाणे पूर्णपणे टाळावे. सध्याची परिस्थिती लक्षात घेता सुरक्षिततेला प्राधान्य देणे आवश्यक आहे.

मुख्यमंत्री यांनी सांगितले की, राज्य शासनाचा आपत्ती व्यवस्थापन कक्ष सातत्याने परिस्थितीवर लक्ष ठेवून असून नियमित आढावा घेतला जात आहे. सर्व जिल्हा प्रशासनांना सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत. कोणत्याही ठिकाणी यंत्रणेत कमतरता राहणार नाही आणि आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने करण्यात येतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. तसेच, गेल्या दोन-तीन दिवसांतील घटनांबाबत, करण्यात आलेल्या मदतकार्याबाबत आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत सविस्तर निवेदन उद्या सादर करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री यांनी स्पष्ट केले.



## संपादकीय....

### पावसाचा तडाखा

मुंबईत सोमवारी दिवसभर मुसळधार पावसाने हजेरी लावली असून शहरातील जनजीवनावर त्याचा मोठा परिणाम झाला आहे. सकाळी ८ ते सायंकाळी ६ या कालावधीत शहर आणि उपनगरांमध्ये जोरदार पावसाची नोंद झाली. मुंबई महापालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन विभागाने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, शहरात तब्बल २९१ ठिकाणी झाडे व फांद्या कोसळल्याच्या, तर २२ ठिकाणी भिंती अथवा घरांचे भाग कोसळल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. हवामान विभागाच्या माहितीनुसार, पुढील तास मुंबई शहर आणि उपनगरात संततधार पाऊस कायम राहणार असून काही भागांत जोरदार ते अति जोरदार, तर काही ठिकाणी अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. याशिवाय ताशी ७० ते ८० किलोमीटर वेगाने सोसाट्याचे वारे वाहण्याचाही इशारा देण्यात आला आहे. महापालिकेच्या अहवालानुसार, मागील २४ तासांत कुलाबा येथे १२८ मिमी, तर सांताक्रूझ येथे १५९.२ मिमी पावसाची नोंद झाली. सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत कुलाबा येथे ३९.२ मिमी, तर सांताक्रूझ येथे ६९.६ मिमी पाऊस झाला. महापालिकेच्या स्वयंचलित पर्जन्यमापन केंद्रांनुसार शहरात २८.२ मिमी, पूर्व उपनगरात ६१.७५ मिमी आणि पश्चिम उपनगरात ६५.४५ मिमी पावसाची नोंद झाली. मुसळधार पावसामुळे शहरात ७४, पूर्व उपनगरात ७८ आणि पश्चिम उपनगरात १३९ अशा एकूण २९१ ठिकाणी झाडे व फांद्या पडल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. तसेच १२ ठिकाणी शॉर्टसर्किटच्या घटना, तर २२ ठिकाणी भिंती किंवा घरांचे भाग कोसळल्याच्या तक्रारी नोंदवण्यात आल्या. सुदैवाने या घटनांमध्ये कोणतीही जीवितहानी झालेली नाही. संबंधित विभागांनी तातडीने मदतकार्य सुरू केले आहे. दरम्यान, पावसाचा जोर असूनही मुंबईतील रस्ते वाहतूक तसेच मध्य आणि पश्चिम रेल्वेची सेवा सुरळीत सुरू असल्याची माहिती महापालिकेने दिली आहे. मात्र, नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडताना खबरदारी घ्यावी, समुद्रकिनाऱ्याजवळ जाणे टाळावे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## मानवतावादी मूल्यांचा संघर्ष जोपासणारी कलाकृती : पाण्याने पेटला वनवा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पाण्याने पेटला वणवा हे मराठी नाटक अलीकडेच भारतीय रंगभूमी व झाडीपट्टी रंगभूमीवर आले आहे. महाडच्या ऐतिहासिक चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त माजी सामाजिक न्याय मंत्री व अर्जुनीमोरगाव विधानसभा आमदार राजकुमार बडोले लिखित आणि प्रशांत निगडे दिग्दर्शित हे नाटक प्रेक्षकांना भूतकाळातील मूक्या असलेल्या माणसांच्या इतिहासाकडे घेऊन जाणारे, मात्र वर्तमानकाळाचे भान जोपासणारे असे आहे.



एक काळ असा होता, की केवळ जन्माच्या आधारावर लाखो लोकांना सार्वजनिक जलस्रोतांनाही स्पर्श करण्याचा अधिकार नाकारण्यात आला होता. मानवी इतिहासातील ही अत्यंत अमानुष व अन्यायकारक सामाजिक व्यवस्था मोडून काढण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २० मार्च १९२७ ला महाड येथे चवदार तळे सत्याग्रहाचे नेतृत्व केले. या ऐतिहासिक सत्याग्रहाला १०० वर्षे पूर्ण झालीत.

ज्या समाजाने शतकानुशतके अन्याय, अत्याचार आणि वेदना सहन केल्या होत्या, पण स्वतःचे हक्क मागण्याची ज्यांची भाषा नव्हती किंवा हिंमत नव्हती (मूक समाज), अशा शोषित आणि वंचित घटकांचे बाबासाहेब 'नायक' (नेते) बनले. उच्चवर्गीयांनी समाजात अस्पृश्यता पाळत ज्यांना शिक्षणापासून आणि अधिकारांपासून दूर ठेवले होते, त्या 'बहिष्कृत' समाजाला बाबासाहेबांनी एकत्र केले. त्यांनी स्वतःच्या हक्कांची जाणीव करून दिली आणि अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी त्यांना उभे केले. चवदार तळ्याचा लढा असो किंवा शिक्षणाचा प्रसार, बाबासाहेबांच्या शब्दांमध्ये आणि विचारांमध्ये प्रचंड ताकद होती. त्यांच्या संघर्षाने शोषितांच्या हातात आत्मविश्वास आणि ताकद निर्माण केली. ही कलाकृती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक कार्याची महती सांगणारी आणि शोषितांमध्ये क्रांतीची मशाल पेटवणारी प्रेरणादायी कलाकृती आहे.

या नाटकाच्या माध्यमातून महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह व आजच्या काळातील पाण्याविषयक प्रश्न असे दोन कालखंड निर्माण होणारे उभे करण्यात आले आहेत. या नाटकातील पात्रे ही जेन झी पिढीची असून, ती इतिहासासोबत संवाद साधताना जीवंत वाटतात. चवदार तळे सत्याग्रहासंबंधित अनेक महत्त्वाचे पैलू या नाटकातून उलगडले गेले.

या सत्याग्रहासंदर्भात बाबासाहेबांनी लढलेली कायदेशीर लढाई, चवदार तळे हे खासगी नव्हे, तर सार्वजनिक मालकीचे आहे, यासंबंधी बाबासाहेबांनी केलेला महासंगर युक्तिवाद अशा अनेक बाबींवर या नाटकातून प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. महत्त्वाचे म्हणजे चवदार तळे खटला जिंकल्यानंतर मुंबईकडे जाण्यास निघालेल्या बाबासाहेब आंबेडकरांना पनवेल येथील हॉटेलमालकाने भजी आणि पाणी देण्यास नकार दिला. त्यानंतर बाबासाहेबांना पाणी पाजण्यासाठी घरातून पाण्याचे मडके घेऊन आलेल्या सोनबा कांबळे यांची राहिलेली भेट हे सर्व प्रसंग उत्तम प्रदर्शित करण्यात आले आहेत. पाण्यावरून झालेले भेदाभेद आजच्या युगातही संपुष्टात आलेले नाहीत; केवळ त्यांचे स्वरूप बदलले आहे. त्यामुळे हा समानतेचा लढा कायम ठेवण्याची गरज या नाटकातून व्यक्त करण्यात आला आहे. समाजमाध्यमे आणि इन्फ्लूएन्सर्सच्या भाऊगर्दीत आजही आणि उद्याही बाबासाहेब हे सर्वांत मोठे इन्फ्लुएन्सर आहेत. त्यांचे एवढे फॉलोअर्स का आहेत, हे अधोरेखित करणारे प्रसंग नाटकात मांडले आहे.

महाडचा सत्याग्रह करताना झालेल्या हिंसाचाराला बाबासाहेबांनी अहिंसेने व कायदेशीर प्रक्रियेने उत्तर दिले होते. आजच्या काळातील अन्यायाविरोधातील लढे हे सनदशीर व संविधानिक मार्गाने द्यावेत. कारण तोच न्याय शेवटपर्यंत टिकतो, असा प्रभावी संदेश निर्मात्यांनी या नाटकातून दिला आहे. मुंबईतील युगंधर क्रिएशन्स एलएलपी प्रस्तुत या नाटकाची निर्मिती शारदा राजकुमार बडोले यांनी केली असून, गणेश मोडक हे सहनिर्माते आहेत.

नाटकाला चवदार तळ्याच्या आंदोलनाची पार्श्वभूमी नेपथ्यातून अधोरेखित केली आहे. नेपथ्य आणि प्रकाशयोजनेच्या माध्यमातून कालखंडानुरूप विविध दृश्ये रंगमंचावर साकार करण्याचा प्रयोग लक्षवेधी आहे. 'पाणी वाढ ग माय' या गाण्यातून तसेच शाहिरी जलसा आणि संगीताच्या माध्यमातून पाण्यावरून होत असलेले भेदाभेद किती तीव्र होते, याचे चित्र प्रभावीपणे उभे केले आहे. शशांक पांचाळ यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका प्रभावी बजावली आहे, तर मयूरी निकम हिने स्वातीची तर मयूरेश मडावी यांनी प्रवीणची भूमिका सशक्तपणे निभावली आहे. इतर सर्व कलावंतांनी आपापल्या भूमिका समर्थपणे निभावल्यामुळे ही नाट्यकृती रसिकांना बांधिलकी जपणारी आहे.

**– मुन्नाभाई नंदागवळी, गोंदिया**
**आंबेडकरवादी साहित्याचे अभ्यासक**
**संवाद – ९७६४६७६४९९**

## सोलापूर जिल्ह्यात 'होम स्टे' संकल्पना ऑनलाइन कार्यशाळा; ग्रामीण पर्यटनाला नवी दिशा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : एकात्मिक पर्यटन विकास प्रकल्प कक्ष, सोलापूर जिल्हा प्रशासन आणि पर्यटन संचालनालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त 'होम स्टे' संकल्पना या विषयावरील ऑनलाइन कार्यशाळेचे आयोजन दि. ८ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता करण्यात आले आहे.

ग्रामीण पर्यटनाला चालना देणे, ग्रामस्थांना पर्यटन क्षेत्रात रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे तसेच पर्यटकांना स्थानिक संस्कृती, परंपरा आणि ग्रामीण जीवनशैलीचा अनुभव देणे, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र पर्यटन धोरण-२०२४ जाहीर केले आहे. या धोरणाच्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील श्री विठ्ठल मंदिर -पंढरपूर, स्वामी समर्थ मंदिर -अक्कलकोट, भगवंत मंदिर -बार्शी, कमला भवानी मंदिर करमाळा,सिध्देश्वर मंदिर- माचनुर ता. मंगळवेढा, शिव-पार्वती मंदिर ता. माळशिरस, व सिध्देश्वर मंदिर सोलापूर, या प्रमुख धार्मिक स्थळांलगतच्या गावांमध्ये 'होम स्टे' संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या कार्यशाळेत पर्यटन क्षेत्रातील स्थानिक भागधारकांना उपलब्ध संधी, शासनाच्या विविध योजना तसेच ग्रामीण पर्यटन विकासाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

कार्यशाळेत सोलापूर जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) तथा जिल्हा पर्यटन समन्वयक सूर्यकांत भुजबळ हे 'सोलापूर जिल्ह्यातील पर्यटन विकास : संधी व दिशा' या विषयावर मार्गदर्शन करतील. तसेच पर्यटन संचालनालय, पुणे येथील उपसंचालक भरत लांघी हे 'होम स्टे' संकल्पना, नोंदणी प्रक्रिया व सहकार्य सुविधा याविषयी माहिती देतील. प्रकल्प व्यवस्थापक महेश कोडगीरे आणि प्रायमव्हचे जितेंद्र नाईक हे 'होम स्टे' संकल्पनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुढील दिशा' या विषयावर मार्गदर्शन करतील.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय मार्गदर्शन उपजिल्हाधिकारी (महसूल) तथा जिल्हा पर्यटन अधिकारी लक्ष्मण कसेकर करणार आहेत.

जिल्हाधिकारी यांच्या सूचनेनुसार 'होम स्टे' योजनेत सहभागी होण्यास इच्छुक महिला स्वयंसहाय्यता गटांचे सदस्य तसेच पर्यटन क्षेत्राशी संबंधित सर्व घटकांनी या ऑनलाइन कार्यशाळेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद श्री. चंद्रशेखर जगताप यांनी केले आहे.

## खचलेला रस्ता, तुंबलेला नाला; पार्कसाईटमधील नागरिकांचे हाल, तातडीच्या उपाययोजनांची मागणी


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : विक्रोळी पश्चिम येथील पार्कसाईट परिसरातील नवजीवन सोसायटी व सम्राट बिल्डिंग कॉम्प्लेक्स परिसरात खचलेला रस्ता आणि तुंबलेल्या नाल्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे.सततच्या पावसामुळे परिस्थिती अधिक गंभीर बनली असून परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार,सम्राट बिल्डिंग परिसरातील मुख्य रस्ता आधीच खचलेला आहे.त्यातच वरील भागात सुरू असलेल्या बांधकाम व तोडफोडीमुळे झोपडपट्टीतील सांडपाणी वाहून नेणारा नाला चोकअप झाला आहे. त्यामुळे सांडपाणी थेट रस्त्यावर वाहत असून नागरिकांना ये-जा करण्यासाठी असलेला एकमेव मार्गही घाणीने व्यापला आहे.पावसाळ्यात या सांडपाण्यामुळे साथीच्या रोगांचा धोका वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.तसेच खचलेल्या रस्त्यामुळे मोठा अपघात होण्याची भीतीही स्थानिकांनी व्यक्त केली आहे.लहान मुले,ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना या समस्येचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे.बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित एन विभागाने या समस्येची तातडीने दखल घेऊन नाल्याची सफाई,सांडपाण्याचा योग्य निचरा आणि खचलेल्या रस्त्याची त्वरित दुरुस्ती करावी,अशी मागणी शिवसेना महिला शाखाप्रमुख पूजा पवार यांनी केली आहे.परिसरात कोणतीही दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात,अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.



खचलेला रस्ता आणि तुंबलेल्या नाल्यामुळे स्थानिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.पावसाळ्यात ही परिस्थिती अत्यंत गंभीर बनली असून महानगरपालिका एन विभाग प्रशासनाने तातडीने नाला सफाई,सांडपाण्याचा निचरा आणि रस्त्याची दुरुस्ती करावी.कोणतीही दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने तात्काळ यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे.

**– पूजा पवार** (शिवसेना महिला शाखाप्रमुख,प्रभाग क्र.१२३)



## बाप सीए, मोठा भाऊ सीए; अर्णवने निवडली वकिलीची स्वतंत्र वाट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : वडील डॉ. भारत कऱ्हाड स्वतः सीए आणि मोठा भाऊही सीए. त्यामुळे अर्णवनेही सीए व्हावे, अशी वडिलांची इच्छा होती. मात्र, मला सीएमध्ये इंटरेस्ट नाही, असे स्पष्ट सांगत अर्णवने स्वतःची स्वतंत्र वाट निवडली.

इंग्रजी माध्यमातून शिक्षण झालेल्या अर्णवने सायन्स शाखेतून बीएससी पूर्ण केली. त्यानंतर एमएससी करण्याऐवजी त्याने कायद्याच्या क्षेत्रात जाण्याचा निर्णय घेतला आणि मुंबईतील प्रतिष्ठित गव्हर्नमेंट लॉ कॉलेज येथे एलएल.बी. अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. त्याच्या स्वतंत्र निर्णयाचा आदर करत कुटुंबानेही त्याला अडवले नाही. वक्तृत्व, ड्राफ्टिंगची आवड, विषय समजून घेण्याची क्षमता, इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व आणि सामाजिक संवादकौशल्य यामुळे त्याचे व्यक्तिमत्त्व काहीसे वेगळे घडले आहे. न्यायाधीश होण्याचे स्वप्न घेऊन त्याने कायद्याच्या क्षेत्रात प्रवेश केला. नुकताच त्याचा एलएल.बी.चा निकाल जाहीर झाला असून, मुंबईच्या गव्हर्मेंट लॉ कॉलेजमधून त्याने कायद्याची पदवी यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. सीए कुटुंबाची पार्श्वभूमी असतानाही स्वतःच्या आवडीचे क्षेत्र निवडून त्याने वकिलीची स्वतंत्र वाट धरली आहे. न्यायाधीश होण्याचे त्याचे स्वप्न आहे.

श्री सुधाकर चाटे, सुदेश कोसुंबकर, प्रा शोभा शिंदे, मंगेश खैरनार, डॉ. बालाजी केंद्रे, शेखर परांजपे, गजानन मुळे, सीए वासुदेव यादवाड, प्रा. छाया आबनावे, संपादक बाळासाहेब फड, दिव्या नागरगोजे, आई डॉ. सुवर्णा कराड, डॉ. अनिल लोहार यांच्यासह अनेकांनी अर्णवचे अभिनंदन करून त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### शिक्षिका शोभा म्हेत्रे यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा उत्साहात

## दुधनी येथील १५४ वर्ष जुन्या जि.प. शाळेचा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी/ता. प्रतिनिधी : जिल्हा परिषद प्राथमिक मराठी केंद्र शाळा, दुधनी येथे शाळेचा १५४ वा वर्धापन दिन तसेच शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका सौ. शोभा म्हेत्रे यांच्या सेवापूर्ती सन्मान सोहळ्याचा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात संपन्न झाला.



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी शाळेच्या १५४ वर्षांच्या शैक्षणिक परंपरेचा गौरव करत विद्यार्थ्यांनी ज्ञान, संस्कार व गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन केले.

यानंतर सेवानिवृत्तीच्या निमित्ताने सौ. शोभा म्हेत्रे मॅडम यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. आपल्या दीर्घ सेवा काळात त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या समर्पित कार्याचा यावेळी गौरव करण्यात आला. तसेच अनेक वर्षे सेवा बजावून बदलीने गेलेले शिक्षक श्रीशैल मलगण यांचाही स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. अनेक मान्यवर, सहकारी शिक्षक, माजी विद्यार्थी व पालकांनी त्यांच्या कार्याचा गौरव करून त्यांना आनंदी, निरोगी व सुखमय निवृत्त जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून दुधनी मठाचे मठाधिपती प. पू. श्री शांतलिंगेश्वर महास्वामीजी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून दुधनी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रथमेश म्हेत्रे उपस्थित होते.

यावेळी दुधनी विरक्त मठाचे मठाधिपती श्री.डॉ.शांतलिंगेश्वर महास्वामीजी,रिपाइं सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी,प्रभारी केंद्रप्रमुख महेश गायकवाड,शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष राजेंद्र इंगळे,महेंदिमिंया जिडगे,माजी विद्यार्थी सिध्दाराम नूला,उपशिक्षिका अंजली गुंजोटे,माजी मुख्याध्यापक मधुकर गाढे,प्रो. बिराजदार,शिक्षक ,विध्यार्थ्यांचे व पालक यांनी मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हणमंत कलशेट्टी, उपाध्यक्ष राजेंद्र इंगळे, रिपाइंचे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, उमाकांत आळंद, दाऊद नदाफ, गोरखनाथ धोडमनी, मेंहदिमिया जिडगे, श्रीशैल चिंचोळी, निंगप्पा निंबाळ, नगरसेवक रौफ निंबाळकर, महादेव खेड, मल्लय्या स्वामी, मधूकर गाडे, सिद्धाराम पाटील, दत्तात्रय हिळ्ळी, राजकुमार बिराजदार, श्रीमंत म्हेत्रे, बसवराज मंत्री, संतोष जोगदे, महिबूब कोरबू, गणपती पवार, शाळेचे मुख्याध्यापक पोमू राठोड, संजीवकुमार बेण्णेसूर, रविकुमार कोरचगाव, सुहास पवार, अंजली गुंजोटे, अश्विनी गोटे व केंद्रातील मुख्याध्यापक ,सर्व शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शाळेचा गौरवशाली इतिहास, शिक्षणाची उज्वल परंपरा आणि सेवाभावी शिक्षकांचा सन्मान या त्रिसूत्रीमुळे हा सोहळा सर्वांच्या कायम स्मरणात राहील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समिती, पालक व ग्रामस्थ यांनी परिश्रम घेतले

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# निसाका आणि ड्रायपोर्टचा प्रश्न सोडविण्यासाठी पक्ष नेतृत्वाकडे पाठपुरावा करणार : आ. गोकुळ गीते



## बंद निसाका, ड्रायपोर्ट आणि ऊस उत्पादकांच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करण्याची ग्वाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : मी विधान परिषदेचा आमदार असलो तरी निफाड हा माझा तालुका आहे. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत निफाड तालुक्यातील जनतेने माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत मोठ्या मताधिक्याने विजय मिळवून दिला. या विश्वासाचे ऋण फेडण्यासाठी तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असून निफाड सहकारी साखर कारखाना (निसाका) पुन्हा सुरू करण्यासाठी तसेच ड्रायपोर्ट प्रकल्प मार्गी लावण्यासाठी पक्ष नेतृत्वाकडे सातत्याने पाठपुरावा करणार, अशी ग्वाही नवनिर्वाचित आमदार गोकुळ गीते यांनी दिली. निफाड येथील रुद्राय हॉलमध्ये निफाड व परिसरातील मित्रपरिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सत्कार सोहळ्यात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निफाडचे प्रथम नगराध्यक्ष राजाभाऊ शेलार हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर, निफाड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन राजाभाऊ राठी, निफाड नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष अनिल पाटील कुंदे, निफाड पंचायत समितीचे माजी सभापती सुभाष कराड, युवा सेनेचे जिल्हाध्यक्ष विक्रम रंधवे निफाड विकास सोसायटीचे माजी चेअरमन बापूसाहेब कुंदे हे उपस्थित होते.

यावेळी निफाड वकील संघाच्या वतीने ड. रामनाथ शिंदे, अरुण डांगळे, लक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन अभिजीत चोरडिया, माणकेश्वर वाचनालयाचे अध्यक्ष मधुकरराव शेलार, निफाड खरेदी-विक्री संघाचे चेअरमन संपतराव डुंबरे, नगरसेवक साहेबराव बर्डे यांनी मनोगते व्यक्त केली. उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणात निफाड तालुक्यासमोरील प्रलंबित प्रश्नांकडे लक्ष वेधले. आशिया खंडात नावलौकिक मिळविलेला निफाड सहकारी साखर कारखाना अनेक वर्षांपासून बंद असल्याने हजारो ऊस उत्पादक शेतकरी अडचणीत सापडले आहेत. तसेच केजीएस साखर कारखान्याकडे अनेक शेतकऱ्यांची उसाची बिले प्रलंबित असल्याने आर्थिक संकट निर्माण झाले आहे. याशिवाय निसाका परिसरात प्रस्तावित ड्रायपोर्ट प्रकल्पाचे काम अनेक वर्षांपासून रखडले असून तो तातडीने मार्गी लावण्याची गरज असल्याचेही मान्यवरांनी नमूद केले.यावेळी बोलताना आ. गोकुळ गीते यांनी तालुक्यातील शेतकरी, कामगार, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देणार असल्याचे सांगितले. निसाका, ड्रायपोर्ट, उद्योगविकास, रोजगारनिर्मिती आणि पायाभूत सुविधांसह तालुक्यातील विकासकामांसाठी शासन आणि पक्ष नेतृत्वाच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली.कार्यक्रमास सचिन गीते, किशोर ढेपले, मुकुंदराजे होळकर, ड. प्रवीण ठाकरे, नीरज चोरडिया, संदीप जेऊघाले, नंदकुमार कापसे संदीप उर्फ बंटी शिंदे, जावेद शेख, दिलीप कापसे, रोहिदास कर्डिले, किरण कापसे, भगवान गाजरे, सुरज कुंदे, संजय कुंदे, सुनील निकाळे यांच्यासह विविध सामाजिक, शैक्षणिक, सहकारी संस्था, व्यापारी, शेतकरी, पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी निफाडच्या प्रलंबित प्रश्नांवर ठोस कार्यवाही करून तालुक्याच्या विकासाला गती देण्याची अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुहास सुरळीकर यांनी केले तर आभार प्रदर्शन संकेत चोरडिया यांनी केले

# सामाजिक न्याय विभागाकडून २० गटई कामगारांना पत्र्याच्या स्टॉलचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या गटई स्टॉल योजनेंतर्गत आज २० पात्र लाभार्थ्यांना पत्र्याच्या स्टॉलचे वाटप करण्यात आले. आज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, सोलापूर येथे सहायक आयुक्त समाज कल्याण सुलोचना सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली व हस्ते हा कार्यक्रम पार पडला.



१९७७ पासून योजना कार्यान्वित-

गटई स्टॉल योजना १९७७ पासून शासनाने अनुसूचित जातीतील चर्मकार, ढोर, होलार, मोची इत्यादी समाजातील लोकांसाठी सुरू केली आहे. महाराष्ट्रात चामड्याच्या वस्तू व पादत्राणे दुरुस्तीच्या व्यवसायात मोठ्या प्रमाणावर अनुसूचित जातीतील व्यक्ती कार्यरत आहेत. हे व्यावसायिक रस्त्याच्या कडेला उन्हातान्हात बसून सेवा देत असतात. त्यांना ऊन, वारा व पावसापासून संरक्षण मिळावे व आर्थिक उन्नती व्हावी यासाठी ग्रामपंचायत, नगरपालिका क्षेत्रात १०० टक्के सहायक अनुदानावर गटई स्टॉल देण्याची योजना राबविण्यात येते.

**समाज कल्याण सहायक आयुक्त सुलोचना सोनवणे यांच्या हस्ते वितरण**

अनुदानाची रक्कम-

सदर योजनेंतर्गत प्रति गटई स्टॉलसाठी रु. ४२,७९७.५० व चर्मोद्योग/पादत्राणे व्यवसायासाठी आवश्यक साहित्य खरेदीसाठी प्रति लाभार्थी रु. ५००० प्रमाणे १०० टक्के सहायक अनुदानावर लाभ दिला जातो. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये या योजनेसाठी एकूण रु. ९,८०,००० इतके अनुदान कार्यालयाकडे प्राप्त झाले आहे.

या कार्यक्रमात सहायक आयुक्त समाज कल्याण, सोलापूर सुलोचना सोनवणे यांच्या हस्ते २० लाभार्थी गटई कामगारांना स्टॉलचे वाटप करण्यात आले. यावेळी कार्यालय व वसतिगृहातील अधिकारी-कर्मचारी तसेच योजनेचे लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मंगळवेढा पोलिसांच्या वतीने घेण्यात आलेल्या हॉलीबॉल सामने संपन्न, सामन्यातील संघाने नोंदवला सहभाग



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मंगळा पोलीस स्टेशनच्या वतीने भरवण्यात आलेल्या हॉलीबॉल स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक सोलापूर ग्रामीण पोलीस संघ व द्वितीय क्रमांक शिवप्रतिष्ठान स्पोर्ट्स, मंगळवेढा तृतीय क्रमांक दिलसे स्पोर्ट्स मंगळवेढा, छोटू दादा अक्कलकोट पोलीस उपविभागी असे अनुक्रमे क्रमांक या स्पर्धेतून अटकावले आहेत.

पोलीस ठाण्याच्या वतीने शनिवार दिनांक चार रोजी भरवण्यात आलेल्या हॉलीबॉल स्पर्धेचे सायंकाळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रेय बोरी गिड्डे यांच्या शुभहस्ते उद्घाटन होऊन स्पर्धेला सुरुवात झाली व पोलीस व जनता यांच्यामध्ये तालुक्याचे संबंध प्रस्थापित व्हावे तसेच नागरिकांमध्ये पोलिसांविषयी विश्वासाचे वातावरण निर्माण व्हावी हा मुख्य उद्देश या सामन्याचा आहे त्या भव्य हॉलीबॉल स्पर्धेचे मंगळवेढा पोलिसांनी प्रथमच आयोजन केले होते व या स्पर्धेसाठी सोलापूर जिल्ह्यातून एकूण ३० संघाने सहभाग घेतला होता या स्पर्धेच्या आयोजनासाठी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक श्री कबड्डी तसेच मंगळवेढा ची डिवाइस पी बसवराज शिवपुजे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा आयोजित केली होती सदर सामने क्षमताच बक्षीस वितरणाच्या कार्यक्रम ही संपन्न झाला या कार्यक्रमासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक ढेरे विनोद लातूरकर पोलीस उपनिरीक्षक विजय पिसे. नागेश बनकर गोपनीय विभागाचे दिगंबर गेजगे पोलीस हवलदार, मनोज खंडागळे विनायक जाधव, हाके, हजारे, गणगे, अन्य पोलीस कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# परिवर्तन राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवावे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : परिवर्तन सामाजिक संस्था नळदुर्ग ता. तुळजापूर जि. धाराशिव ही संस्था गेली ३० वर्षे सामाजिक क्षेत्रात काम करीत आहे. महिला सक्षमीकरण, पाणी व्यवस्थापन,पर्यावरण, पंचायत राज, व्यसनमुक्ती इत्यादी विषयात काम करीत असून समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना उत्तेजन देण्यासाठी आणि त्यांच्या कार्याची प्रेरणा इतरांना मिळावी या हेतूने सन २००२ पासून परिवर्तन राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करीत आहे याही वर्षी राज्यस्तरीय पुरस्कार देऊन अशा मान्यवरांना सन्मानित येणार आहे. तरी कला, क्रीडा, पत्रकारिता, साहित्य, युवा, व्यसनमुक्ती,उत्कृष्ट कामगिरी केलेले सरपंच, उद्योजक यांनी आपले प्रस्ताव दिनांक २५ जुलै २०२६ पर्यंत मारुती बनसोडे सचिव, परिवर्तन सामाजिक संस्था व्यंकटेश नगर नळदुर्ग ता. तुळजापूर जि. धाराशिव ४१३६०२ . मो.नं.९६०४१६६८९९ या पत्त्यावर पाठवावे असे आवाहन परिवर्तन सामाजिक संस्थेचे संस्थापक सचिव मारुती बनसोडे यांनी केले आहे.

# बार्टी संस्थेमार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग महाराष्ट्र राज्यसेवा,स्थापत्य अभियांत्रिकीसेवा पूर्व परीक्षा २०२६ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षा तयारी करिता आर्थिक सहाय्य योजना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे,मार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग महाराष्ट्र राज्यसेवा,स्थापत्य अभियांत्रिकीसेवा पूर्व परीक्षा २०२६ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षा तयारी साठी एकरक्कमी आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. या परीक्षेस पात्र असलेल्या महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी प्रती विद्यार्थी रक्कम रु. १५,०००/- एकरक्कमी आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग महाराष्ट्र राज्यसेवा, स्थापत्य अभियांत्रिकीसेवा पूर्व परीक्षा २०२६ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी आर्थिक सहाय्य देणेबाबत घोषित केले आहे. सदर निकालानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्यसेवा, अभियांत्रिकीसेवा पूर्व परीक्षा २०२६ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षा तयारी करिता आर्थिक सहाय्य देण्यात येते.पात्र असलेल्या उमेदवारांना एकरक्कमी रक्कम रु. १५,०००/- चे आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. त्याबाबत सविस्तर जाहिरात व ऑनलाईन फॉर्म बार्टी संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन बार्टी संस्थे मार्फत करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी http://barti.maharashtra.gov.in > NOTICEBOARD > Maharashtra Public Service Commission State Services, Civil Engineering Services Mains 2026 येथे भेट द्यावी.

# सोलापुरात शनिवारी जिल्हा नियोजन समितीची सभा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




सोलापूर : ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर जिल्हा नियोजन समितीची महत्त्वपूर्ण बैठक शनिवार, दि. ११ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता नियोजन भवन, सोलापूर येथील जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव कार्तिकेयन एस. यांनी या बैठकीसंदर्भातील परिपत्रक जारी केले आहे. बैठकीत मागील बैठकीच्या इतिवृत्तांतास व त्यावरील कार्यवाहीच्या अहवालास मान्यता देण्यात येणार आहे.

**बैठकीतील प्रमुख विषय**

१. सन २०२५-२६ च्या खर्चास मान्यता : जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ अंतर्गत सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना यांचा दि. ३१ मार्च २०२६ अखेरच्या खर्चास मान्यता देण्यात येईल.

२. सन २०२६-२७ च्या प्रारूप आराखड्यास मान्यता : जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ अंतर्गत सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना यांच्या कामांच्या प्रारूप आराखड्यावर चर्चा करून मान्यता दिली जाणार आहे.

३. आयत्यावेळचे विषय : मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने आयत्यावेळचे विषय बैठकीत मांडण्यात येतील.

या बैठकीस सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी परिपूर्ण माहितीसह स्वतः उपस्थित राहावे, प्रतिनिधी पाठवू नये, अशा स्पष्ट सूचना जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिल्या आहेत.

**कल्याणशेट्टी महाविद्यालयात नॅक मूल्यांकन प्रेरित कार्यशाळा**

# महाविद्यालयांनी शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी नॅक मूल्यांकन करावे : प्रा. डॉ. सिद्राम पुजारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : महाविद्यालयातील अध्यापन, संशोधन, पायाभूत सुविधा, विद्यार्थी सेवा प्रशासन व्यवस्था आदीची गुणवत्ता नॅक समितीकडून तपासून घेतल्यास महाविद्यालयास नॅकचे मानांकन प्राप्त होते. त्यानंतर राष्ट्रीय अनुदान मंडळाकडून भरघोस आर्थिक निधी देखील उपलब्ध होतो, म्हणून महाविद्यालयांनी स्वतःच्या शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी नॅक मूल्यांकन करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन प्रा. डॉ. सिद्राराम पुजारी यांनी केले.




महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयात विद्यापीठाच्या सूचनेनुसार नॅक मूल्यांकन व पुनर्मल्यांकन प्रेरित कार्यशाळा घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते व्यासपीठावर संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ दिगंबर झोंबाडे, प्राध्यापिका डॉ लक्ष्मी मुशन, समन्वयक मलकप्पा भरमशेट्टी प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, नॅक समन्वयक प्रा हर्षदा गायकवाड, प्रा राजशेखर पवार उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ दिगंबर झोंबाडे म्हणाले की, नॅक मूल्यांकनामुळे महाविद्यालय प्राचार्य व शिक्षकांना स्वतःच्या कार्यपद्धतीचे वस्तुनिष्ठ परीक्षण करता येते. संस्थेला देखील आपली बलस्थाने आणि करावयाच्या सुधारणाचा अंदाज येतो, विद्यार्थ्यांना अधिक दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देता येते म्हणून नॅक मूल्यांकन करणे आवश्यक आहे.


प्रा. डॉ. लक्ष्मी मुशन म्हणाल्या की, नॅक मानांकनामुळे विद्यार्थ्यांचा, पालकांचा आणि समाजाचा संस्थेवरील विश्वास अधिक दृढ होतो. चांगली ग्रेड प्राप्त झाल्यास संस्थेस व प्राध्यापकांना संशोधन, शैक्षणिक सहकार्य, शासकीय अनुदाने आणि विविध विकास योजनांमध्ये अधिक संधी मिळते. तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर संस्थेची प्रतिमा उंचावण्यास मदत होते.

**नॅक चे नवीन पोर्टल कार्यान्वित होताच महाविद्यालयाचे मूल्यांकन होईल**

**उत्कृष्ट अध्यापन, पारदर्शक प्रशासन, विद्यार्थी-केंद्रित उपक्रम, सामाजिक बांधिलकी आणि नाविन्यपूर्ण कार्यपद्धतीच्या जोरावर नवीन पोर्टल कार्यान्वित होताच आमचे महाविद्यालय नॅक मूल्यांकनासाठी सामोरे जाणार आहे असे मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी आपल्या भाषणातून सांगितले.**

प्रारंभी पंचप्पा कल्याणशेट्टी यांच्या प्रतिमेस वंदन करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन प्रा डॉ शितल झिंगाडे यांनी केले तर आभार प्रा सौरभ भस्मे यांनी मानले. या कार्यशाळेस महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.

# भातसा नदीवरील वालकस पूल पाण्याखाली; हजारो नागरिकांचा संपर्क तुटला



नाची राहील, असा इशारा दिला आहे.

## नऊ महिन्यांपासून नवीन पूल अर्धवट; रेल्वे रुळांवरून जीव धोक्यात घालून प्रवास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : सतत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे भातसा नदीला आलेल्या पुरामुळे भिवंडी आणि कल्याण तालुक्यांना जोडणारा वालकस-बेहेरे येथील जुना पूल पुन्हा एकदा पाण्याखाली गेला आहे. परिणामी वालकस, बेहरे, कोशिंबीसह परिसरातील हजारो नागरिकांचा बाहेरील जगाशी संपर्क तुटला असून वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. यामुळे शाळकरी विद्यार्थी, नोकरदार, शेतकरी, व्यावसायिक तसेच रुग्णांचे मोठे हाल होत असून संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले आहे. जुना पूल पाण्याखाली गेल्याने नागरिकांना खडवली रेल्वे स्थानक गाठण्यासाठी दोन ते तीन किलोमीटर अंतर रेल्वे रुळांवरून जीव मुठीत घेऊन पायी चालावे लागत आहे. हा मार्ग अत्यंत धोकादायक असून याच रेल्वेमार्गावर यापूर्वी १३ ग्रामस्थांचा रेल्वे अपघा-तात मृत्यू झाला आहे. तरीही सुरक्षित पर्यायी व्यवस्था करण्यात प्रशासन



अपयशी ठरल्याची तीव्र नाराजी ग्राम स्थांनी व्यक्त केली आहे.

विशेष म्हणजे, दरवर्षी पावसाळ्यात सुमारे ५० ते ५५ वर्षे जुना वालकस पूल पुराच्या पाण्याखाली जातो आणि हजारो नागरिकांचा संपर्क तुटतो. ही समस्या कायमची असतानाही तिच्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात प्रशासनाला अद्याप यश आलेले नाही. त्यामुळे प्रत्येक पावसाळ्यात नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. वालकस नदीवरील नवीन पूल आणि कोशिंबी-वालकस काँक्रीट रस्त्यासाठी सुमारे २० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पुलाच्या दोन्ही बाजूंचे काँक्रीट रस्त्यांचे काम पूर्ण झाले असले तरी नवीन पुलाचे बांधकाम गेल्या नऊ महिन्यांपासून अर्धवट अवस-

### भूसंपादनाच्या वादामुळे काम ठप्प, प्रशासनाकडून लवकर तोडग्याचे आश्वासन

थेत पडून आहे. पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण झाले असते, तर आज हजारो नागरिकांना या संकटाचा सामना करावा लागला नसता, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. पूल बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण, शेतकऱ्यांची शेतीची कामे, नोकरदारांची ये-जा आणि आजारी रुग्णांना वेळेत रुग्णालयात पो-होचवणे अत्यंत कठीण झाले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, वालकस, बेहरे आणि परिसरातील हजारो नागरिकांनी नवीन पुलाचे रखडलेले काम तातडीने पूर्ण करून सुरक्षित पर्यायी मार्ग उपलब्ध करून द्यावा, अन्यथा भविष्यात कोणतीही दुर्घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्रशास-

**भातसा नदीवरील वाळकास-बेहेरे येथे नवीन पुलाचे बांधकाम सुरू आहे. मात्र कोशिंबी गावाच्या हद्दीतील प्रांताधिकाऱ्यांनी केलेल्या मूल्यांकनानुसार भूसंपादनाची भरपाईची रक्कम प्रांताधिकारी कार्यालयात जमा करण्यात आली आहे. मात्र संबंधित शेतकऱ्यांनी वाढीव मोबदल्याची मागणी केल्यामुळे कोशिंबी बाजूचे पुलाचे काम सध्या तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.**

**शेतकऱ्यांच्या मागणीवर लवकरच योग्य तो तोडगा काढून पुलाचे बांधकाम पूर्ववत सुरू करण्यात येईल.**

**– उपअभियंता मदन हिरवे,**
**सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कल्याण**

**आमच्या गावासाठी भातसा नदीवरील पूल अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे गावकऱ्यांना दररोज मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. पावसाळ्यात नदी ओलांडणे धोकादायक बनते. विद्यार्थ्यांचे शिक्षण, कामगार व शेतकऱ्यांची ये-जा तसेच आजारी व्यक्तींना वेळेवर उपचार मिळण्यात अडचणी निर्माण होतात. अनेक वर्षांपासून गावकरी या नवीन पुलाची वाट पाहत आहेत. शासन आणि संबंधित प्रशासनाने पुलाच्या कामाला तातडीने गती देऊन लवकरात लवकर पूल पूर्ण करावा, जेणेकरून दरवर्षी पावसाळ्यात ग्रामस्थांची होणारी गैरसोय कायमची दूर होईल.**

**– ग्रामस्थ, धनराज लोणे**

---

# चांदोरी बसस्थानकाची दुरवस्था; खड्डे, चिखल अन् मूलभूत सुविधांचा अभाव, प्रवाशांचा संताप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी :- येथील बसस्थानकाची दुरवस्था दिवसेंदिवस गंभीर होत असून पावसाळ्यात ही समस्या अधिकच तीव्र झाली आहे. बसस्थानक परिसरात ठिकठिकाणी मोठे खड्डे पडल्याने त्यामध्ये पावसाचे पाणी साचत आहे. परिणामी संपूर्ण परिसरात चिखल व घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून प्रवासी, विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा



बस ये-जा करताना चिखलमिश्रित पाणी व खडी प्रवाशांच्या अंगावर उडते. त्यामुळे बसमध्ये

**चांदोरी येथील बस स्थानकात विविध समस्यांमुळे प्रवाशांची कुचंबना होत आहे. पुढील वर्षी येणाऱ्या कुंभमेळ्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या बस स्थानकात मात्र प्रचंड अस्वच्छता, खड्डे आणि दुर्गंधीमुळे प्रवासी हतबल आहे. एसटी महामंडळ प्रशासन व लोकप्रतिनिधींनी या समस्यांची तातडीने दखल घेणे गरजेचे आहे.**

**– संतोष टले,**
**निवृत्त न्यायाधीश. चांदोरी**

सामना करावा लागत आहे. वारंवार तक्रारी करूनही एसटी प्रशासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याने प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

चांदोरी हे परिसरातील महत्त्वाचे गाव असून येथील बसस्थानकातून दररोज शेकडो प्रवासी तसेच विद्यार्थी विविध ठिकाणी प्रवास करतात. मात्र बसस्थानकाच्या परिसरातील रस्ते पूर्णपणे उखडले असून पावसाचे पाणी खड्ड्यांमध्ये साचल्यामुळे चढताना व उतरताना अनेकांना मोठी कसरत करावी लागत असून अपघाताचीही शक्यता निर्माण झाली आहे.बसस्थानकात प्रवाशांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांचाही अभाव असल्याचे चित्र आहे. पिण्याच्या स्वच्छ पाण्याची व्यवस्था नाही, परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच स्वच्छतागृहाची सुविधा उप-लब्ध नसल्यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे.याशिवाय बसस्थानक परिसरात काही नागरिक उघड्यावर शौचास बसत असल्याने परिसरात दुर्गंधी पसरत असून अस्वच्छतेमुळे आरोग्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे. पावसामुळे साचलेले पाणी, चिखल आणि कचरा यामुळे डासांची उत्पत्ती वाढण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.स्थानिक नागरिक व प्रवाशांनी अनेक वेळा संबंधित प्रशासनाकडे या समस्यांकडे लक्ष वेधले असले तरी अद्याप कोणतीही प्रभावी कार्यवाही झा-लेली नाही. त्यामुळे बसस्थानक परिसरातील खड्डे तातडीने बुजवावेत, पावसाच्या पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करावी, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, सीसीटीव्ही कॅमेरे आदी मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, तसेच परिसराची नियमित स्वच्छता करून प्रवाशांना सुरक्षित व स्वच्छ वातावरण उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी प्रवासी, विद्यार्थी व ग्रामस्थांनी एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केली आहे.

प्रवाशांच्या दैनंदिन गैरसोयी लक्षात घेऊन एसटी महामंडळाने तातडीने या समस्यांची दखल घेऊन बसस्थानकाचा कायापालट करावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# पंढरपूर परप्रांतीय व्यापाऱ्यात हाणामारी; पोलिसांनी कारवाई करावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरातील स्टेशन रोड जुना दगडी पुळ आणि गोपाळपूर रस्ता या परिसरात गेल्या अनेक महिन्यापासून परप्रांतीय व्यापारी येथे व्यवसाय करीत आहे. जुना दगडी फुल परिसरात परप्रांती व्यापारी या भागांमध्ये भेटीचे वातावरण निर्माण झाले आहे. दहशत निर्माण करणाऱ्या संबंधित व्यापाऱ्यावर कारवाई करावी अशी मागणी नागरिक व भाविकांककडून होऊ लागली आहे.

पंढरपूर हे राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे विठ्ठलाच्या दर्शनासाठी दररोज ५० ते एक लाख भाविक येतात. हो येणारी भाविक विविध वस्तूंची खरेदी करतात. त्यामुळे पंढरपुरामध्ये परप्रांती व्यापारी मोठ्या प्रमाणात आले आहेत. रेल्वे स्टेशन रोड गोपाळपूर रस्ता व जुना दगडी पूल, या भागामध्ये त्यांनी आ-पले व्यवसाय सुरू केले आहे. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर अनेक परपंथी व्यापारी आल्याचे दिसून येत आहे.

काही कारणावरून दुपारी सोमवारी जुना दगडी पूल या परिसरात मोरपंथी व्यापाऱ्यामध्ये जबरदस्त हाणामारी झाल्यामुळे प्रीतीचे वातावरण निर्माण झाले व पंढरपुरात दहशतीचे वाता-वरण निर्माण करणाऱ्या संबंधित परप्रांती व्यापाऱ्यावर पोलिसांनी कारवाई करावी अशी मागणी होऊ लागली आहे.

---

# ध्यान केल्याने मन प्रसन्न राहते : ओंकारेश्वर उटगे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

### पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात ध्यान शिबिर

अक्कलकोट : आजच्या धावपळीच्या जीवनात ध्यानाचे महत्त्व अधिक वाढले आहे. कामाचा ताण, चिंता, नैराश्य आणि अस्थिर जीवनशैली यांमुळे अनेकांना मानसिक त्रास जाणवतो. अशा वेळी दररोज काही मिनिटे ध्यान केल्यास मन प्रसन्न राहते, आत्मविश्वास वाढतो, सकारात्मक विचार आणि एकाग्रता वाढते, असे प्रतिपादन प्रख्यात कर सल्लागार ओंकारेश्वर उटगे यांनी केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या कै पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात आयोजित केलेल्या ध्यान शिबिर कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती, विद्याधर गुरव, दत्तात्रय कटारे, संतोष जवळगे, मल्लिनाथ सलगर, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी व दिगंबर जगताप उपस्थित होते.



यावेळी विद्याधर गुरव म्हणाले की, ध्यानाचा परिणाम शारीरिक आरोग्यावर होतो, नियमित ध्यानामुळे रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते, झोपेची गुणवत्ता सुधारते आणि शरीरातील थकवा कमी होतो. त्यामुळे शरीर आणि मन यांच्यात समतोल निर्माण होतो.

**ध्यानाचे फायदे आत्मसात करा**

**मनशांती, तणावमुक्त जीवन, सकारात्मक विचार, आनंदी व समाधानी जीवन, अभ्यासात एकाग्रता हे ध्यानाचे फायदे आहेत ते विद्यार्थ्यांनी आत्मसात करावे असे ध्यान प्रशिक्षक ओंकारेश्वर उटगे यांनी सांगितले.**

दत्तात्रय कटारे म्हणाले की, विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी, व्यावसायिक तसेच ज्येष्ठ नागरिक अशा प्रत्येकासाठी ध्यान उपयुक्त आहे. विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढते, स्मरणशक्ती सुधारते आणि अभ्यासात लक्ष केंद्रित करणे सोपे जाते. प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात काही वेळ ध्यानासाठी दिल्यास निरोगी, आनंदी आणि समाधानी जीवन जगणे अधिक सुलभ होईल.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक निशिगंधा सोमेश्वर यांनी केले, सूत्रसंचालन कल्पना स्वामी यांनी केले तर आभार पर्यवेक्षक सिद्रामप्पा पाटील यांनी मानले.

---

**फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १७८ वी वैचारिक कार्यशाळा संपन्न**

# आधुनिक भारतासाठी अभ्यासक्रमात आंबेडकरवादाचा समावेश आवश्यक : बी. बी. मेश्राम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर, दि. ५ जुलै : आधुनिक भारताच्या सामाजिक, शैक्षणिक व लोकशाही व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी प्रबळ आंबेडकरवादी विचारांची गरज असून, विद्यार्थ्यांमध्ये संविधाननिष्ठ, चारित्र्यसंपन्न व सामाजिकदृष्ट्या जबाबदार नागरिक घडविण्यासाठी केजी ते पीजी अभ्यासक्रमात आंबेडकरवादाचा समावेश करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम यांनी केले.



फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघ यांच्या संयुक्त विद्यमाने पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या वर्धापनदिनानिमित्त साकेतनगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ८ जुलै १९४५ रोजी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली नसती तर शैक्षणिकदृष्ट्या आपण कुठे असतो? या विषयावर आयोजित १७८ व्या मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेच्या अध्यक्षीय समारोपात ते बोलत होते.

मेश्राम म्हणाले की, पीपल्स एज्युकेशन सोसायटीची वाटचाल समजून घेण्यासाठी संस्थेची बायलॉज, नियमावली व रूल्स-रेग्युलेशन्स यांचा सखोल अभ्यास आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दूरदृष्टीने तयार केलेल्या नियमावलीचे काटेकोर पालन झाले असते, तर संस्थेची आजची स्थिती वेगळी असती. संस्थेतील अंतर्गत मतभेद चर्चेतून सोडवून बाबासाहेबांच्या शैक्षणिक ध्येयाशी सुसंगत कार्यपद्धती विकसित करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. वामनदादा कर्डक यांच्या माझ्यातला भीम, मीच केला उना या ओळींचा संदर्भ देत त्यांनी आत्मपरीक्षणाचे आवाहन केले.

उद्घाटक तथा मिलिंद महाविद्यालयाचे प्राध्यापक सुधाकर नवसागर यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेमागील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची व्यापक शैक्षणिक दृष्टी स्पष्ट केली. शिक्षणामुळे वंचित समाजात स्वाभिमान जागृत झाला आणि अन्यायाविरोधात संघर्ष करण्याची ताकद निर्माण झाली, असे ते म्हणाले. औरंगाबादमध्ये अनेक महाविद्यालये आणि पुढे विद्यापीठ उभे राहील, असा बाबासाहेबांचा विश्वास आज सत्यात उतरल्याचेही त्यांनी नमूद केले.

प्रमुख वक्ते ॲड. राहुल गायकवाड यांनी तांत्रिक प्रगतीसोबत वैचारिक सबलीकरणाची गरज अधोरेखित केली. शिक्षणाच्या संधी वाढल्या असल्या तरी वैचारिक प्रगल्भतेचा अभाव समाजासमोर मोठे आव्हान असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी इंजि. अशोक मेश्राम, ॲड. राहुल डी. गायकवाड, राज गायकवाड, शशिकांत काळे, मिलिंद बागुल आणि डॉ. कल्पना गंगावणे यांनीही मनोगते व्यक्त केली. बाबासाहेबांच्या शैक्षणिक कार्याचा वारसा जपत समाजाप्रती उत्तरदायित्व जपण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्प-हार अर्पण करण्यात आला. प्रास्ताविक सुभाष ठोकळ यांनी केले. सूत्रसंचालन ॲड. सुनील कुमार नागवंश यांनी, तर आभार ॲड. राहुल डी. गायकवाड यांनी मानले.

शब्दांकन : मेश्राम बी. बी. (संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फॉउंडेशन), ४, साकेतनगर, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र.

संपर्क : ९४२१६७८६२८, ८९८३०८२१२८ (व्हाट्सअप)